THANE CITY
Safe Thane Secure Thane

प्रेसनोट

शांतीनगर पोलीस ठाणे,भिवंडी
परिमंडळ-२, भिवंडी ठाणे शहर
दिनांक ०५/०९/२०२५

'' खुनाच्या गुन्हयातील १० महिण्यापासुन फरार असलेल्या पाहिजे आरोपीस उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश येथुन अटक शांतीनगर पोलीसांची कामगीरी''

शांतीनगर नगर पोलीस स्टेशन, गु.र.नं.१६६७/२०२४ भा.न्या.स. कलम १०३, ३३३, ११८(१), ३(५), महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१),१३५ प्रमाणे दिनांक २८/१०/२०२४ रोजी गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हा हा एकतर्फी प्रेमातुन आरोपींने महिलेचा खुन केला होता. सदर गुन्हयात यापुर्वी दोन आरोपीत यांना अटक केली होती. परंतु नमूद गुन्हातील मुख्य आरोपीत राजू महेंद्र सिंग, वय २२ वर्ष, राहणार. जिल्हा भदोही, राज्य उत्तर प्रदेश, हा तेव्हा पासून फरार झाला होता. यापूर्वी दोन वेळा पोलीस पथक त्याचे मूळ गावी जाऊन आले होते, परंतु तो तेथे गुन्हा घडल्यापासून आलाच नाही व त्याचा मोबाईल देखील तेव्हापासून बंद होता. आमचे गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की नमूद आरोपीत हा प्रयागराज, उत्तर प्रदेश येथे आला आहे म्हणून आम्ही लागलीच पोलीस पथक दिनांक ३१/१०/२०२५ रोजी प्रयागराजसाठी रवाना केले. त्यानंतर आम्ही तांत्रीक पध्दतीने माहिती घेतली असता तो देवासनाका, इंदौर, मध्य प्रदेश येथे असल्याचे समजले. दिनांक ०२/०९/२०२५ रोजी सकाळी बातमीदारास फोनवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्याचेशी संपर्क होऊ शकला नाही. त्यानंतर पोलीस पथकाने आरोपीताचा मोठा भाऊ हा ट्रकचालक असल्याने, त्याची तांत्रीक पध्दतीने माहिती घेतली असता ते देखील देवासनाका, इंदौर, मध्य प्रदेश येथे असल्याचे समजले. त्यानंतर आरोपीत हा त्याचे भावासोबत असल्याचा संशय आल्याने, लागलीच तपास पथकातील पोलीस शिपाई ८२४२ प्रशांत बर्वे यांनी इंदौर क्राईम ब्रँच येथे त्यांच्या परिचयाचे पोलीस उपनिरीक्षक यांना संपर्क करून आरोपीताचा फोटो पाठविला. त्यांनी ताबडतोब त्यांच्या पोलीस टीमला सदर ठिकाणी पाठवून आरोपीचा शोध घेण्यास सांगितले. त्यांनी सदर भागात आरोपीचा कसून शोध घेतला असता नमूद आरोपीत हा त्यांना मिळून आला. आरोपीने इंदौर क्राइम ब्रांच पोलिसांना आपली ओळख लपवुन सुरज असे चुकीचे नाव सांगितले, परंतु आरोपीताच्या हातावर टॅटू असल्याचे आमच्या पोलीस पथकाने त्यांना सांगितले व त्यांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीताच्या हातावर टॅटू असल्याचे पाहून आरोपीताची ओळख पटवली. त्यानंतर लागलीच आरोपीस ताब्यात घेवुन शांतीनगर पोलीस ठाणे येथे घेऊन येऊन नमूद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. आरोपीत यास मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपींची दिनांक ०८/०९/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक अतुल अडुरकर करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त शशिकांत बोराटे, सहा.पोलीस आयुक्त सचिन सांगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, पोनि (गुन्हे) अतुल अडूरकर, पोनि(प्रशासन) विनोद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, पोहवा/१६८५ रिझवान सैय्यद, पोहवा/६६०३ रोजश पाटील, पोहवा/६९०४ निलेश महाले, पोशि/८२४२ प्रशांत बर्वे, पोशि/८३१७ रोशन जाधव, पोशि/३७५२ नाजीम शेख, पोशि/४७१७ दिपक सानप, पोशि/३०२६ कुशल जाधव, पोशि/३५२८ संजय चव्हाण, पोशि/४०९८ भुषण पाटील, पोशि/४१४९ निलेश पाटील यांनी केली आहे.

